**वाचा:** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सिएफआर १२११ प्र.क्र. २५७/ तेरा, दिनांक ०२.०२.२०१७

---

क्र स्था नि ले प /१८/ब/ले.ल.(व)/ सह.मनपालेप -कार्या.अह-१७-१८-इष्टांक निश्चित करणेबाबत / २११७. दिनांक:

06 OCT 2017

**सन २०१७-१८ या वर्षासाठी कार्यमूल्यमापन अहवाल (गोपनीय अहवाल) लिहिण्याकरिता संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्या अधिनस्त सहसंचालक , स्थानिक निधी लेखापरीक्षा (मनपालेप) कार्यालयात कार्यरत असलेले सहाय्यक संचालक, उपसंचालक व सहसंचालक यांचे इष्टांक निश्चित करुन गुणांकनाच्या आधारे प्रतवारी ठरविण्याबाबत**

## -: परिपत्रक :-

**प्रस्तावना:-**

सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ०२.०२.२०१७ च्या शासन निर्णयाद्वारे या विभागाच्या अखत्यारित असलेल्या क्षेत्रीय कार्यालयातील गट अ मधील अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल ऑन लाईन पध्दतीने भरण्याचा निर्णय घेतला आहे. सदर गुणांकनासाठी तीन भाग करण्यात आलेले आहेत.

**१) कार्यपुर्तता**

**२) वैयक्तिक गुणवैशिष्टये**

**३) कार्यक्षमता**

कार्यपुर्ततेच्या गुणांकनासाठी संचालनालयातील महानगरपालिका लेखापरीक्षण शाखेतील सहाय्यक संचालक, उप संचालक व सह संचालक यांचे इष्टांक निश्चित करण्याची बाब संचालनालयाच्या विचाराधीन होती. कार्यमुल्यमापन अहवालासाठी उद्दिष्टेपुर्तीचे निकष निश्चित करण्यात आले असुन ते पुढीलप्रमाणे अंतीम करण्यात येत आहेत

**निकष:-**

स्थानिक निधी लेखापरीक्षा, संचालनालयातील महानगरपालिका लेखापरीक्षण शाखेतील सहाय्यक संचालक, उप संचालक व सह संचालक यांचे सन २०१७-१८ या वर्षांचे कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्यासाठी पुढीलप्रमाणे उद्दिष्टये व उद्दिष्टयपुर्तीनंतर दयावयाचे गुणांकन निश्चित करण्यात येत आहे.

१.१ **सहाय्यक संचालक यांचे कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्यासाठीचे उद्दिष्टये व उद्दिष्टयपुर्तीनंतर दयावयाचे गुणांकन निश्चिती:-**

| अ. क्र. | उद्दिष्टये | गुणांकन | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **१० गुण** | **८ गुण** | **५ गुण** | **२ गुण** |
| १ | महानगरपालिका लेखापरीक्षण चालु असताना प्रत्येक आठवडयामध्ये एक परिच्छेद MAINS प्रणालीवर अपलोड करणे. | १००% इष्टांकपुर्ती | ९१ % ते ९९% इष्टांकपुर्ती | ८१ % ते ९०% इष्टांकपुर्ती | ८० % व ८० % पेक्षा कमी इष्टांकपुर्ती |
| २ | मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील कलम १० (३) नुसार विहित कालावधीत प्रथम पुढील अभिप्राय कळविणे. | विहित कालावधीच्या १५ दिवस पुर्वी | विहित कालावधीच्या १० दिवस पुर्वी | विहित कालावधीत | विहित कालावधीनंतर |
| ३ | महानगरपालिका लेखापरीक्षण अहवाल निर्गमन | लेखापरीक्षण पुर्ण झाल्यापासुन सरासरी ६० दिवसात | लेखापरीक्षण पुर्ण झाल्यापासुन सरासरी ६१-७९ दिवसांत | लेखापरीक्षण पुर्ण झाल्यापासुन सरासरी ८०-९० दिवसांत | लेखापरीक्षण पुर्ण झाल्यापासुन सरासरी ९१ दिवस व त्यापेक्षा जास्त दिवस |
| ४ | पुनर्विलोकन अहवालासाठी प्रस्तावित करण्यात येणारे परिच्छेद | महानगरपालिका लेखापरीक्षण अहवाल निर्गमनानंतर १५ दिवसांमध्ये | महानगरपालिका लेखापरीक्षण अहवाल निर्गमनानंतर १६ ते २० दिवसांमध्ये | महानगरपालिका लेखापरीक्षण अहवाल निर्गमनानंतर २१ ते २५ दिवसांमध्ये | महानगरपालिका लेखापरीक्षण अहवाल निर्गमनानंतर २५ दिवसांपेक्षा अधिक |

**२.उप संचालक यांचे कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्यासाठीचे उद्दिष्टये व उद्दिष्टयपुर्तीनंतर दयावयाचे गुणांकन निश्चिती:-**

| अ. क्र. | उद्दिष्टये | गुणांकन | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **१० गुण** | **८ गुण** | **५ गुण** | **२ गुण** |
| १ | मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील कलम १० (३) नुसार विहित कालावधीत प्रथम पुढील अभिप्राय कळविणे. | विहित कालावधीच्या १५ दिवस पुर्वी | विहित कालावधीच्या १० दिवस पुर्वी | विहित कालावधीत | विहित कालावधीनंतर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | महानगरपालिका लेखापरीक्षण अहवाल निर्गमन | लेखापरीक्षण पुर्ण झाल्यापासुन सरासरी ६० दिवसात | लेखापरीक्षण पुर्ण झाल्यापासुन सरासरी ६१-७९ दिवसांत | लेखापरीक्षण पुर्ण झाल्यापासुन सरासरी ८०-९० दिवसांत | लेखापरीक्षण पुर्ण झाल्यापासुन सरासरी ९१ दिवस व त्यापेक्षा जास्त दिवस |
| ३ | पुर्नविलोकन अहवालासाठी सहाय्यक संचालक यांनी प्रस्तावित केलेले परिच्छेद अंतिम करुन सह संचालक यांचेकडे पाठविणे. | सहाय्यक संचालक यांनी प्रस्तावित केल्यानंतर १५ दिवसांमध्ये | सहाय्यक संचालक यांनी प्रस्तावित केल्यानंतर १६ ते २० दिवसांमध्ये | सहाय्यक संचालक यांनी प्रस्तावित केल्यानंतर २१ ते २५ दिवसांमध्ये | सहाय्यक संचालक यांनी प्रस्तावित केल्यानंतर २५ दिवसांपेक्षा अधिक |

१. **सह संचालक यांचे कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्यासाठीचे उद्दिष्टये व उद्दिष्टयपुर्तीनंतर दयावयाचे गुणांकन निश्चिती:-**

| अ. क्र. | उद्दिष्टये | गुणांकन | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **१० गुण** | **८ गुण** | **५ गुण** | **२ गुण** |
| १ | मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील कलम १० (३) नुसार विहित कालावधीत प्रथम पुढील अभिप्राय कळविणे. | विहित कालावधीच्या १५ दिवस पुर्वी | विहित कालावधीच्या १० दिवस पुर्वी | विहित कालावधीत | विहित कालावधीनंतर |
| २ | महानगरपालिका लेखापरीक्षण अहवाल निर्गमन | लेखापरीक्षण पुर्ण झाल्यापासुन सरासरी ६० दिवसात | लेखापरीक्षण पुर्ण झाल्यापासुन सरासरी ६१-७९ दिवसांत | लेखापरीक्षण पुर्ण झाल्यापासुन सरासरी ८०-९० दिवसांत | लेखापरीक्षण पुर्ण झाल्यापासुन सरासरी ९१ दिवस व त्यापेक्षा जास्त दिवस |
| ३ | पुर्नविलोकन अहवालासाठी उप संचालक यांनी प्रस्तावित केलेले परिच्छेद अंतिम करणे. | उप संचालक यांनी प्रस्तावित केल्यानंतर १५ दिवसांमध्ये | उप संचालक यांनी प्रस्तावित केल्यानंतर १६ ते २० दिवसांमध्ये | उप संचालक यांनी प्रस्तावित केल्यानंतर २१ ते २५ दिवसांमध्ये | उप संचालक यांनी प्रस्तावित केल्यानंतर २५ दिवसांपेक्षा अधिक |
| ४ | महानगरपालिका लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल सन २०१३-१४ अंतिम करणे. | २८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत | १५ मार्च २०१८ पर्यंत | ३१ मार्च २०१८ पर्यंत | ३१ मार्च २०१८ नंतर |

उपरोक्त कोष्टकाचा वापर करुन कार्यपुर्तता अनुषंधे ४० गुण सरासरी रुपांतरीत करुन गुणांकन करावे.

**टिप:-**

उपरोक्त नुसार महानगरपालिका लेखापरीक्षण शाखेतील सहाय्यक संचालक व उपसंचालक यांचे उद्दिष्टय पुर्तता बाबत उद्दिष्ट निहाय सविस्तर मासिक विवरण प्रतिवेदन अधिकारी ( सहसंचालक म.न.पा.ले.प.) यांनी ठेवावे व वर्षाअखेरीस अधिकारी निहाय अहवाल संचालनालयास सादर करावा.

सह संचालक महानगरपालिका लेखापरीक्षण शाखा यांचे कामकाजाचे स्वरुप हे पर्यवेक्षीय मागदर्शक, समन्वयक व नियत्रंक स्वरुपाचे असल्याने क्षेत्रीय अधिकारी यांना योजुन देण्यात आलेली उद्दिष्टये विहित कालावधीत पुर्ण होतील हे पाहणे क्रमप्राप्त आहे. तद्नुसार उद्दिष्टयनिहाय सरासरी कामकाजावरुन सह संचालक महानगरपालिका लेखापरीक्षण शाखा यांचे कार्यमुल्यांकन करण्यात येईल.

सदर परिपत्रक संचालनालयाचे www.mahalfa.maharashtragov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(प्रताप मोहिते)**
संचालक,
संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.

प्रत:

१. सहसंचालक(म.न.पा.ले.प), नवी मुंबई
२. उपसंचालक (म.न.पा.ले.प.), नवी मुंबई
३. उपसंचालक (म.न.पा.ले.प.), औरंगाबाद
४. सर्व सहाय्यक संचालक (म. न.पा. ले.प.)